MHAH190005752022

**<u>कौटुंबिक हिंसाचार अर्ज क्र.२८/२०२२ मधील नि.क्र.११ वरील आदेश</u>**

**(मनिषा गाढे वि. रघुनाथ व इतर)**

महिलांचा घरगुती जुलुमापासून रक्षण करण्यासंबंधीचा कायदा २००५ अंतर्गत दाखल केलेल्या मूळ प्रकरणामध्ये अर्जदार अंतरिम पोटगी मागत आहे. (इतःप्पर “सदर कायदा” असे संबोधले आहे).

२. **अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–**

अर्जदार आणि गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह ११.११.२०११ रोजी हिंदू धर्म शास्त्राप्रमाणे हातगाव येथे झाला. विवाहानंतर गैरअर्जदारांनी अर्जदारास केवळ ०३ महिने व्यवस्थित नांदविले व त्यानंतर त्रास देण्यास सुरुवात केली. गैरअर्जदार नं. १ व २ हे काटेकोरपणे वागणे, मानसिक त्रास देणे, मारहाण करणे, संशय घेणे अशा प्रकारचा त्रास देत असत. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार अर्जदार ही मोलमजूरी करुन तिचे पोट भरत असे. तसेच अर्जदाराकडून घरकुल मंजूर झाल्यानंतर वाळू चाळूण घेतली व नवीन घर झाल्यानंतर तिला घरात येवून देत नाहीत अर्जदार ही गोठयात राहते. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार सदरचा गोठा पुर्ण पडझड झाल्यामुळे तिने तिचा पसारा नवीन घरात ठेवला तर गैरअर्जदारांनी तिचा पसारा बाहेर फेकून दिला व तिला खूप मारहाण केली. तसेच अर्जदाराचे दुखत असल्यास गैरअर्जदार हे आतापर्यंत तिला दवाखान्यात घेवून जात नसत. गैरअर्जदार हे अर्जदारास म्हणतात की, तुझे भावाकडून १,००,०००/– घेवून तरच तुला नवीन घरात प्रवेश दिला जाईल नाहीतर तुला सुखात राहू देणार नाही. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार गैरअर्जदार नं. १ याने अर्जदार हिचा त्याग केल्यापासून तिची काहीही व्यवस्था केलेली नाही. अर्जदार हिस उत्पन्नाचे साधन नाही ती पूर्णपणे गैरअर्जदार नं. १ वर अवलंबून आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार गैरअर्जदाराकडे ३ ते ४ एकर बागायती शेती असून त्यामधून दरवर्षी ५,००,०००/– (पाच

लाख ) रुपये उत्पन्न मिळते. त्यामुळे अर्जदाराने गैरअर्जदार नं. १ कडून दरमहा १०,०००/– रुपये पोटगी मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. गैरअर्जदारची आर्थिक परिस्थिती चांगली असल्याने त्याची अंतरिम पोटगी देण्याची त्यांची ऐपत आहे असे म्हटले आहे.

३. गैरअर्जदार क्र. १ व २ हे विधीज्ञांमार्फत हजर झाले व त्यांनी नि १२ पुरसीस देवून नि.१० वरील म्हणणे हे सदर अर्जावरील म्हणणे समजण्यात यावे असे कथन केलेले आहे. अर्जातील कथने पूर्णपणे नाकारली आहेत. त्यांनी अर्जदारासोबतचे नातेसंबंध मान्य केले आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार गैरअर्जदार नं. २ हिचे लग्न गैरअर्जदार नं. २ सोबत सन १९८३ साली झाले होते परंतु त्यांना बरेच वर्ष मुलबाळ होत नसल्यामुळे त्यांनी एकविचाराने व गैरअर्जदार नं. २ हिचे संमतीने अर्जदाराशी गैरअर्जदार नं. १ सोबत दि. ११.११.२०११ रोजी दुसरे लग्न झालेले आहे. गैरअर्जदाराच्या म्हणण्यानुसार अर्जदाराने मी येथे दुसाटयावर राहणार नाही, माझा विचार न घेता तुमच्यासोबत लग्न झाल्याने सतत काही कारण काढून माहेरी जात असे. तसेच वेगळे राहण्याचा तगादा लावत असे. तुम्हाला मुलबाळ होवू देणार नाही असे म्हणत असे. गैरअर्जदार आजही अर्जदार हिस नांदावयास तयार आहेत. परंतु अर्जदार हि स्वतःच्या मर्जीने माहेरी निघुन गेली आहे. त्यामुळे अर्जदारास अंतरिम पोटगी मिळण्याचा कोणताही अधिकार नाही. वरील सर्व कारणांमुळे प्रस्तुतचा अर्ज खारीज करण्याची विनंती केली आहे. अर्जदारचे वकील ***श्री. एच. एल. म्हस्के*** व गैरअर्जदार क्र. १ ते ६ यांचे विधीज्ञ ***श्री. एस. बी . सानप*** यांचा युक्तिवाद ऐकला. अर्ज, म्हणणे व कागदपत्रे विचारात घेतली. त्यानुसार अंतरिम अर्जाच्या दृष्टीने खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. त्यांचे सकारण निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.नं.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत का?<br>असल्यास कोणाला व किती? | : | अंशतः होकारार्थी.<br>अर्जदारास<br>१,०००/– रुपये |
| २. | काय आदेश? | : | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

४. अर्जदाराने तिच्या म्हणण्यापृष्टर्थ कौटुंबिक हिंसा घटना अहवाल, मौजे भालगाव येथील शेतजमीन गट नं. २४६, २४४ चे ७/१२ उतारे व खाते क्र. ९२० चा आठ अ चा उतारा , मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र इ. कागदपत्रे दाखल केली आहेत. उलटपक्षी गैरअर्जदार यांनी मालमत्ता व दायित्वाच्या शपथपत्राखेरीज काहीही कागदपत्र दाखल केलेले नाहीत.

**मुद्दा क्र.१ व २ बाबत** –

५. सदर कायद्यातील तरतुदीनुसार शपथपत्रावर आधारुन अर्जदार अंतरिम दाद मागू शकते. गैरअर्जदारांविरुद्ध अनेक कथने तिने सदर अर्जात आणि त्याच्या पृष्ठ्यर्थ दाखल केलेल्या शपथपत्रात केली आहेत. गैरअर्जदारच्या मारहाणीमुळे अर्जदार ही सदर कायद्यातील संज्ञेनुसार **“व्यथित व्यक्ती”** या संज्ञेत मोडते. घरगुती जुलमाबाबत तिच्या शपथपत्रातील कथने विचारात घेता गैरअर्जदार क्र. १ ने तिचा मानसिक छळ करुन भावनिक दुरुपयोग केल्याचे दिसते. तसेच माहेरी गेल्यानंतर तिची आर्थिक सोय न केल्यामुळे आर्थिक दुरुपयोग केला असे सकृतदर्शनी दिसते. अर्जदार सध्या गैरअर्जदारांसमवेत रहात नाही. अंतरीम अर्जाच्या सुनावणीस अर्जदार गैरअर्जदारासमवेत राहते किंवा कसे आणि नसल्यास गैरअर्जदारांने त्यांची सोय केली अगर कसे हे पाहणे संयुक्तीक आहे. तसेच ईतर आरोपांबाबत मुळ अर्जाच्या सुनावणीच्या वेळी पुराव्यावरुन निर्णीत करण्याच्या बाबींबाबत यावेळी भाष्य करणे न्यायोचित नाही.

६. गैरअर्जदारांच्या लेखी म्हणणेत अर्जदारासोबतचे नातेसंबंध मान्य आहेत. तसेच गैरअर्जदार क्र. १ यांची अर्जदारासोबत नांदण्याची इच्छा असल्याचे असे कथन केले आहे. यावरुन अर्जदार सध्या त्यांच्यासोबत रहात नाही हे स्पष्ट होते. तसेच अर्जदाराने कौटुंबिक हिंसा घटना अहवाल दाखल केलेला आहे. त्यामुळे ती माहेरी गेल्यानंतर तिची आर्थिक सोय न केल्यामुळे आर्थिक दुर्व्यवहार केला असे सकृतदर्शनी दिसते.

७.  गैरअर्जदार क्र.१ हा यास शेती उत्पन्नातून वार्षिक रुपये ५ लाख मिळतात असे अर्जदाराने शपथपत्रात नमूद केले आहे. अर्जदाराच्या सदरच्या कथनापृष्टयर्थ अर्जदाराने ७/१२ उतारे पटलावर दाखल केले आहेत. अर्जदाराने उत्पन्नाबाबत जरी याबाबत कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नसला तरी त्याबाबत अर्जदाराने शपथपत्रावर तसे नमूद केले आहे व ७/१२ उता–यावर गैरअर्जदाराचे नाव लागलेले आहे व तो निश्चीतच त्यातून काहीतरी उत्पन्न मिळवितो. सकृतदर्शनी गैरअर्जदार यांची परिस्थिती चांगली असल्याचा अंदाज बांधता येतो. तसेच गैरअर्जदार यांनी अर्जदार हिस उत्पन्नाचे साधन आहे असे कोठेही म्हटले नाही.

८.  प्रस्तुत अंतरीम अर्जाचा विचार करता अर्जदार सध्या माहेरी राहत असून ती माहेरी राहिल्यापासुन गैरअर्जदारांनी तिची कसलीहि सोय केली नाही. तिच्यावर स्वतःच्या पालनपोषणाची जबाबदारी आहे. त्यामुळे तिची अंतरिम पोटगीची मागणी मंजुर करणे न्यायिक आहे.

९.  दाखल कागदपत्रे व अर्जदार व गैरअर्जदार यांचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र यांचे अवलोकन केले. गैरअर्जदाराने त्याच्या मालमत्ता व दायित्वाच्या शपथपत्रामध्ये५,०००/– रुपये प्रतिमहिना इतके उत्पन्न मिळते असे नमुद केलेले आहे. तसेच गैरअर्जदाराला उत्पन्नाचे साधन असल्याचे व त्याला शारीरिक कुठलीही व्याधी नसल्याचे देखिल नमुद केलेले आहे. यावरुन गैरअर्जदाराला उत्पन्नाचे साधन असून तो शरिराने धडधाकट असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच अभिलेखावरील अर्जदाराने दाखल केलेले ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, गैरअर्जदार यांच्या नावे शेत मिळकत आहे परंतु सदर शेतमिळकतीसाठी कोणताही कायमस्वरुपी पाण्याचा स्त्रोत गैरअर्जदाराला उपलब्ध नाही. सदरची शेती हंगामी व जिरायती असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येते. त्यामुळे सदरची बाब ही अर्जदाराला पोटगी देताना निश्चीतच विचारात घेणे न्यायोचित होईल. तसेच अंतरिम पोटगीचा आदेश पारीत करताना उभयतांचे राहणीमान, गैरअर्जदारावर असणारी जबाबदारी आणि सद्याच्या जिवनावश्यक वस्तुंच्या किंमती विचारात घेणे आवश्यक आहे. करीता अर्जदार हीस दरमहा रुपये १,०००/– अंतरिम पोटगी तुर्तास गैरअर्जदार क्र. १ कडून मिळणे न्यायिक आहे.

१०. अंतरिम पोटगी बाबत गैरअर्जदार क्र.१ याचेशिवाय इतर गैरअर्जदारांपासून तसा आदेश करण्यासारखी स्थिती तुर्त तरी दिसत नाही. म्हणून मुद्दा क्र.१ मी त्यानुसार निष्कर्षित आहे. सबब आदेश–

## आदेश

१. अर्ज अंशतः खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

२. सदर अर्ज दाखल तारखेपासून म्हणजे दि २२/०२/२०२३ पासून गैरअर्जदार क्र.१ याने दरमहा अर्जदार हिस रुपये १,०००/–(अक्षरी रुपये एक हजार मात्र)अंतरिम पोटगी दाखल पुढील आदेश होईपर्यंत द्यावेत.

३. खर्चाबाबत अंतिम निर्णयावेळी आदेश करण्यात येईल.

४. सदर आदेशाच्या प्रती सदर कायद्याचे कलम २४ अन्वये संबंधीतांना विनाशुल्क देण्यात याव्यात.

sd/–
(मोनाली अ. बेंद्रे)
दिनांक– ०१/०२/२०२४ २ रे सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
शेवगाव .